**फौजदारी चौकशी अर्ज क्र.१९३/२०१७**

**<u>आदेश निशाणी क्र.५</u>**

०१. सदर अर्ज अर्जदाराने अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे. दिनांक १९/१२/२०१० रोजी अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह मौजे उमरोली खरवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे बौध्द धर्माशास्त्राप्रमाणे झाला. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यांची पत्नी असून विवाह बंधनातून त्यांना अर्जदार क्र.२ तनुष्का ही मुलगी झाली. लग्नानंतर सामनेवालाच्या घरी काही दिवस संसार सुखासमाधानाने झाला. त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा कमला हायस्कुल या शाळेवर शिपाई पदावर कार्यरत आहे. सुरुवातीचे सहा महिने चांगले गेल्यानंतर सामनेवाला क्र.१ व २ अर्जदारास दुस-यांचे घरकाम करण्यासाठी जबरदस्ती करत असे. अर्जदाराने त्यास नकार दिला असता सामनेवाला क्र.१ तिला मारहाण करत असे व सामनेवाला क्र.२ ही तिला शिवीगाळी करत असे. सामनेवालाचे नातेवाईक जर आजारी पडले तर सामनेवालो हे अर्जदारास त्यांच्याकडे काम करण्यास जबरदस्तीने कामास पाठवायचे आणि जर अर्जदाराने नकार दिला तर ते तिला शिवीगाळ व मारहाण करत असे. सामनेवाला क्र.२ हिने सामनेवाला क्र.१ यास अर्जदार हिस घरातून बाहेर काढण्यास सांगितले.

०२. अर्जदार यांनी भावकीमार्फत नोटीस दिली असता सामनेवाला व अर्जदार यांच्या भावकीची मिटींग झाली. सदरचे मिटींगला ग्रामस्थ व सामनेवाला देखील हजर होते. साधारण एक महिन्यानंतर सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराला पाचाड येथे मावशीकडे नेले. तेथे दोन दिवस राहिल्यानंतर डोंगरोली येथे चुलत्याकडे नेले व मी रुम घेतली आहे, तु थोडे दिवस येथेच रहा असे अर्जदारास सांगितले. त्यावेळी अर्जदाराने सामनेवाला यास नकार दिला असता सामनेवाला याने अर्जदार हिस माहेरी नेले व नेण्यासाठी येतो असे सांगून मुंबईला निघून गेला. सामनेवाला याने

अर्जदार हिस साधारण एक वर्षानंतर कुलाब्याला नेले व तेथे अर्जदार ही घ ारकाम करुन राहत असे. अर्जदार बाळंतपणानंतर चार महिन्याने मुंबई येथे खोली भाडयाने घेवून राहात होती. अर्जदाराने सामनेवाला क्र.२ हिस सामनेवाला क्र.१ च्या वागणुकीबाबत सांगणेचा प्रयत्न केला असता सदरचा प्रकार कोणाला सांगितला तर ठार मारण्याची धमकी सामनेवाला याने अर्जदाराला दिली. त्यानंतर अर्जदार ही माहेरी निघून आली व वर्षभर माहेरी राहिली. अर्जदाराने संगिता या नावाने महिला दक्षता कमिटी आयोग खार पुर्व, मुंबई येथे शारीरिक व मानसिक त्रासाविषयी अर्ज केला होता.

०३. दिनांक ०८/०१/२०१७ रोजी सामनेवाला यास नोटीस दिली व दिनांक २२/०१/२०१७ रोजी मु. उमरोली, ता. माणगांव येथे भावकीच्या मिटींगमध्ये बोलावले. सदरच्या मिटींगमध्ये सामनेवाला क्र.१ याने अर्जदार ही माझ्याकडे घटस्फोट मागत होती व ११ वर्षाच्या मुलीवर संशय घेते असे उलटसुलट सांगितले. तसेच सामनेवाला क्र.१ याने मी अर्जदारास नांदवणार नाही व मुलीचा ताबा माझ्याकडे दया असे बोलले. अर्जदार ही अशिक्षित असल्यामुळे तिला नोकरीधंदा करुन उदर निर्वाह करणे अशक्य आहे. अर्जदारा व्यतिरिक्त सामनेवाला याचेवर कोणीही अवलंबून नाही. तसेच सामनेवाला हा हायस्कुलमध्ये कामाला असून सामनेवाला क्र.१ यास प्रतिमहा २५,०००/- रू. इतका पगार मिळत आहे. त्यामुळे अर्जदाराने अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यत पालनपोषणाकरीता अर्जदार क्र.१ हिस दरमहा ८,०००/- रुपये व अर्जदार क्र.२ हिस दरमहा ४,०००/- रुपये असे एकूण १२,०००/- रू. प्रतिमहा मिळावे अशी विनंती केली आहे.

०४. सामनेवाला यांनी सदरच्या अर्जावर नि.क्र.१५ कडे म्हणणे दाखल केले. सामनेवालाने त्याच्या अर्जदाराचे सर्व कथने नाकारले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार हिने लग्नानंतर कधीच घरातील कामकाजामध्ये हातभार लावलेला नाही. तसेच अर्जदाराने सामनेवाला क.१ यास कमावर

जाताना डबा दिलेला नाही. सामनेवाला क्र.२ हया वयोवृध्द असून त्यांना हृदयविकाराचा आजार असल्यामुळे घरातील कामकाज करण्यावरुन अर्जदार ही भांडण करुन स्वत:च्या मर्जीने माहेरी निघून आलेली आहे. सामनेवाले हे सासरी मुंबई येथे येण्यासाठी अर्जदारास वेळोवेळी विनंती करत असे परंतु अर्जदार प्रतिसाद देत नसलेमुळे सामनेवाला यांच्या मध्यस्थीमुळे दिनांक २६/०१/२०१३ रोजी मौजे उमरोली, ता. माणगांव, जि. रायगड येथे बौध्दजन पंचायत आणि प्रज्ञाशिल विकास मंडळ डोंगरोली यांची बैठक झाली.

०५. दिनांक २९/१२/२०१६ रोजी अर्जदाराने खार निर्मल नगर पोलीस स्टेशन येथे जावून सांगितले की, मला माझ्या नव-यासोबत नांदावयाचे नाही, मला घटस्फोट पाहिजे. सदरची बाब सामनेवाला यांनी पोलिसांशी संपर्क केला असता पो. नि. संदीप केसणे यांनी सामनेवाला यास सांगितली. दिनांक २२/०१/२०१७ रोजी सामनेवाला याने अर्जदार हिला समज देण्याच्या उद्देशाने बौध्दजन पंचायत समिती, शाखा क्र.५, खरवली, ता. माणगांव, जि. रायगड आणि खार, मुंबई बौध्दजन समिती मध्ये सामुहिक बैठक घेतली. सामनेवाला याने अर्जदार व त्यांची मुलगी यांची कौटुंबिक जबाबदारी म्हणून त्यांच्या उदरनिर्वाहा करीता अर्जदाराचे खाते नसल्याने अर्जदाराचे वडील यांच्या बॅक खात्यावर पैसे पाठवत आहेत. सामनेवाला यांच्या म्हणण्यानुसार ते एका खाजगी शाळेमध्ये शिपाई असून तात्पुरती नोकरी करत असून त्यांना दरमहा रुपये १०,०००/- इतका पगार असून त्यांच्या आईची जबाबदारी देखील त्यांच्यावर आहे. सामनेवाला क्र.२ यांना हृयविकार असल्याने त्यांच्या औषधोपचारासाठी देखील सामनेवाला क्र.१ यास रुपये ३,०००/- खर्च करावा लागतो. तसेच उर्वरित रकमेतून सामनेवाला क्र. १ हा घरगुती खर्च आणि त्यांच्या पत्नी आणि मुलीला दरमहा पैसे पाठवत आहे. सबब, सामनेवाला याने अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६. सदरचा अर्ज वाचला. अर्जदारास स्वत:च्या उपजीविकेचे साधन नाही. अर्जदार क्र.१ व २ हे अर्जदाराच्या माहेरी राहतात. त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवालाने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले असे दिसते. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सामनेवाला हा हायस्कुलवर शिपाई असून त्यास २५,०००/- इतका पगार मिळतो. अर्जदार ही स्वत:च्या व मुलीच्या पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. सामनेवालाने तिच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे तसेच अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे अर्जदारास हलाखीचे जीवन जगावे लागत आहे.

०७. सामनेवालाच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदाराने सदरच्या उत्पन्नाच्या कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. परंतु प्रथमदर्शनी अंतरिम अर्जाच्या कामी पुरावा ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे अभिलेखावर उत्पन्नाचा कागदोपत्री पुरावा नसेल तरी अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र. १ यांची पत्नी असल्यामुळे सामनेवाला क्र.१ यांची नैतिक जबाबदारी अर्जदार क्र.१ व २ यांना सांभाळण्याची, पालनपोषणाची बनते.

०८. सामनेवालातर्फे वकिलांनी त्यांच्या लेखी युक्तीवादामध्ये असे म्हटले की, सामनेवाले हे अर्जदार व मुलीकरीता दरमहा दोन हजार ते अडीच हजार अर्जदाराच्या वडिलांच्या खात्यात जमा करतात. त्यामुळे त्यांनी त्यांच्या पत्नीची व मुलीची जबाबदारी नाकारली नाही असे कथन केले. पुढे असे सांगितले की, अर्जदार स्वत: सामनेवालाचा स्वमर्जीने त्याग करुन माहेरी गेली. त्यामुळे दरम्यानची पोटगी मिळणेस अर्जदार पात्र ठरत नाही असे त्याने म्हटले आहे. त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये पुढे असे म्हटले आहे की, अर्जदार ही तिची वैवाहीक व कुटुंब जबाबदारी पार पाडत नाही. अर्जदार ही सी.आर.पी. कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळणेस पात्र नाही. याकरीता सामनेवालाने युक्तीवादाच्या पृष्ठयर्थ मा. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

शरदचंद्र शहारद चंद्रशेखर विरुध्द इंदूबाई शरद सतभाई यांचा न्यायनिर्णय दाखल केला, यामध्ये " has deserted the petitioner for a continuous period of not less than two years immediately preceding the presentation of the petition;

**Explanation** - In this section, the expression 'desertion', with its grammatical variations an cognate expressions, means the desertion of the petitioner by the other party to the marriage without reasonable cause and without the consent or against the wish of such party, and includes the wilful neglect of the petitioner by the other party to the marriage. "

सदरच्या न्यायनिर्णयाची विस्तृतपणे वाचन केल्यानंतर असे लक्षात येते की, सदरचा केस लॉ अर्जदाराच्या अर्जास लागू पडत नाही. कारण प्रथमदर्शनी सामनेवालाच्या शारीरिक व मानसिक त्रासामुळे अर्जदाराला विनाकारण माहेरी राहावे लागले. त्यामुळे अर्जदाराने स्वत:हून सामनेवालाचा त्याग केलेला नाही ही प्रथमदर्शनी बाब अभिलेखावर आलेली आहे.

०९. सामनेवालातर्फे वकिलांनी अर्जदार व मुलीच्या पालनपोषणाकरीता अर्जदाराच्या वडिलांच्या खात्यामध्ये पैसे जमा केलेची बाब व त्या संदर्भात पासबुक एन्ट्रीज दाखल केले असले तरी तो अंतिम निकालाच्या वेळी ग्राहय धरला जाईल. सध्याच्या पासबुकाच्या एन्ट्रीज प्रथमदर्शनी पुरावा म्हणून ग्राहय धरता येवू शकत नाही.

१०. त्याचप्रमाणे अर्जदाराजवळ आज रोजी उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला यांची आहे. अर्ज निकाली निघण्यास विलंब होवू शकतो. त्यामुळे

अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी १०००/- रू. असे एकूण २०००/- रू दरमहा अंतरिम पोटगी नि.क्र.५ च्या अंतिम निकालापर्यत मंजूर करण्यात योग्य ठरते. करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

०१. नि.क्र.५ कडील अर्ज अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्ज दाखल तारखेपासून सामनेवालाने अर्जदार क्र.१ प्राजक्ता प्रफुल्ल लोखंडे करिता दरमहा रक्कम रूपये १०००/- व अर्जदार क्र.२ तनुष्का प्रफुल्ल लोखंडे हिच्या शालेय शिक्षणाकरिता व पोषणाकरीता दरमहा रक्कम रुपये १०००/- असे एकूण एकत्रितरित्या र.रू. २०००/- अंतरिम पोटगी निकाल होईपर्यत मंजूर करण्यात येत आहे.

०३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

माणगांव (सो. न. सावळेश्वरकर)
दिनांक : ३०/११/२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माणगांव.